# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि/यु.८/ १३२/२०२३ — दिनांक / /२०२३

**वाचा:-** १) विशेष नोटीस क्र. उमपा/करवि/यु.८/५६/१३२, दिनांक २९/०३/२०२३

२) श्री. प्रविण पांडुरंग जाधव यांनी दि. १२/०४/२०२३ रोजी दाखल केलेली हरकत. (ना.सु.केंद्र टोकन क्र. ४१२०२३००००६९९९)

३) जा.क्र./उमपा/करवि/१३२, दि. ३१/०५/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस.

४) सुनावणीचा दिनांक ०७/०६/२०२३

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 56DO011944500 (शांती प्रकाश आश्रम, गायकवाड पाडा, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता कर निर्धानासंबंधी संदर्भ क्र. १ अन्वये विषेश नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये संदर्भित मिळकती करीता कर आकारणी जास्त असुन अनधिकृत बांधकाम शास्ती लागु करण्यात आली आहे. ती अमान्य आहे. तसेच सदरील मिळकत ही लाकडी पोट माळयाची असल्याने त्यावर आकारण्यात आलेला मालमत्ता कर व अनधिकृत बांधकाम शास्ती रद्द करावी. अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार संबंधितास सुनावणीस उपस्थित राहणे बाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सुनावणी दरम्यान श्री. प्रविण पांडुरंग जाधव (पांडुरंग परशुराम जाधव) हे गैरहजर असुन त्यांनी संदर्भ क्र. २ चे अर्जान्वये सदरील मिळकती करीता कर आकारणी जास्त असुन अनधिकृत बांधकाम शास्ती लागु करण्यात आली आहे. ती अमान्य आहे. सदरील मिळकत ही लाकडी पोट माळयाची असल्याने त्यावर आकारण्यात आलेला मालमत्ता कर व अनधिकृत बांधकाम शास्ती रद्द करावी. असे निवेदन सादर केले आहे.

त्याअनुषंगाने संबंधित विभागाचे कर निरीक्षक व मे. कोल्ब्रो गृप कंपनी यांचे मार्फत सदर मिळकतीची प्रत्येक्ष पाहणी केली असुन मे. कोल्ब्रो गृप कंपनी यांनी दाखल केलेल्या अहवालानुसार बांधकाम प्रकार टिअर गर्डर २६९.८९ चौ. फुट व एसी शिट ब्रिक्स ५२१.५५ चौ. फुट क्षेत्रफळ जागेवर असल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 56DO011944500 (शांती प्रकाश आश्रम, गायकवाड पाडा, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता बांधकाम प्रकार टिअर गर्डर २६९.८९ चौ. फुट व एसी शिट ब्रिक्स ५२१.५५ चौ. फुट क्षेत्रफळ गृहीत धरुन कर आकारणी करणे उचित वाटते.

सबब उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 56DO011944500 (शांती प्रकाश आश्रम, गायकवाड पाडा, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता बांधकाम प्रकार टिअर गर्डर २६९.८९ चौ. फुट व एसी शिट ब्रिक्स ५२१.५५ चौ. फुट क्षेत्रफळ गृहीत धरुन मिळकतीचे करयोग्य मुल्य व कर आकारणी निश्चित करुन संबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावणेस शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 56DO011944500 (शांती प्रकाश आश्रम, गायकवाड पाडा, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता बांधकाम प्रकार टिअर गर्डर २६९.८९ चौ. फुट व एसी शिट ब्रिक्स ५२१.५५ चौ. फुट क्षेत्रफळ गृहीत धरुन मिळकतीचे करयोग्य मुल्य व कर आकारणी निश्चित करावी. व संबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत,

१) मे. कोल्ब्रो गृप, नागपुर यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी

२) श्री. प्रविण पांडुरंग जाधव रा.अजिंठा कॉलनी, जागृती विद्यालय रोड, गायकवाड पाडा नं. २, सेक्शन-३६, उल्हासनगर-५